खबरदारी

# बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी

प्रा.डॉ. एस.के. आरबाड
प्रा.डॉ. एस.के. फाजगे
कृषी महाविद्यालय, ता. नायगाव (बा.), जि. नांदेड

'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या संत तुकाराम महाराजांच्या वचनानुसार शेतकऱ्यांनी देखील दर्जेदार बियाणे खरेदीचा आग्रह ठेवत खरेदीच्या वेळी योग्य ती खबरदारी घेतली पाहिजे. चांगला पाऊस पडताच खरिपाच्या पेरणीचा कालावधी सुरू होईल. त्यासाठी शेतकऱ्यांनी पुढीलप्रमाणे आवश्यक ती काळजी घेणे जरूरी आहे.

१) बियाणे विश्‍वासू बीज परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावे. तसेच ते सीलबंद असले पाहिजे.

२) कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या संकरित व सुधारित सरळ वाणांचा व आपल्या क्षेत्रामध्ये ज्या वाणाचे उत्पादन चांगले आले आहे, असे अनुभवलेल्या वाणांचा वापर करावा.

३) खरेदीची पावती (बिल) तसेच बियाण्याचा संपूर्ण तपशील (पीक, वाण, संपूर्ण लॉट नंबर, वजन, बियाणे) ज्या कंपनीचे आहे त्या कंपनीचे नाव, बियाण्याची किंमत, खरेदीदाराचे संपूर्ण नाव व पत्ता, विक्रेत्याचे नाव व सही इत्यादी नमूद असलेली रोखी, उधारीची पावती घ्यावी.

४) बियाण्याच्या वैध मुदतीची पावती घ्यावी तसेच वैध मुदतीच्या आतील बियाणेच खरेदी करावे.

५) ज्या बियाण्याची उपलब्धता बाजारात कमी आहे, अशा बियाण्यासाठी जास्त आग्रह न धरता त्या तोडीचे इतर बियाणे घ्यावे. बियाणे ऐन वेळेवर खरेदी न करता प्रथम नियोजन करावे.

६) बियाण्याच्या पिशवीवर नमूद केलेल्या एम.आर.पी. दरापेक्षा जास्त दराने बियाणे खरेदी करू नये. तसेच काही वेळा नमूद एम.आर.पी. वर सूट दिलेली असते, ते बघूनच किंमत द्यावी.

७) बियाणे खरेदीची पावती, वेष्टन (बॅग) व त्यावरील लेबल (टॅग) इत्यादी शेतकऱ्यांनी जपून ठेवावेत.

८) बियाणे खरेदी करताना सबंधित विक्रेता उपरोक्त सूचनांप्रमाणे विवरणासह बिल देत नसल्यास, तसेच मुदतबाह्य बियाण्याची छापील किंमतीपेक्षा अधिक दराने विक्री करत असल्यास या सबंधीची तक्रार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा सबंधित कंपनीच्या जिल्हा कार्यालयात लेखी स्वरुपात तक्रार करावी.

९) खरेदी केलेले बियाणे बिलाप्रमाणे व सीलबंद असल्याची खात्री करून घ्यावी. पेरणीसाठी खरेदी केलेल्या बियाण्याची पेरणीपर्यंत योग्य जागी व सावलीत साठवण करावी. ओलसर जागी, खताजवळ बियाण्याची साठवण करू नये.

**बियाण्याचे प्रकार**

१) पैदासकार बियाणे (Breeder Seed) टॅगचा रंग पिवळा, पायाभूत बियाणे तयार करण्यासाठी उपयोग.

२) पायाभूत बियाणे (Foundation Seed) टॅगचा रंग पांढरा, प्रमाणित बियाणे तयार करण्यासाठी उपयोग.

३) प्रमाणित बियाणे (Certified Seed) टॅगचा रंग निळा, धान्य उत्पादनाकरिता पेरणीसाठी उपयोगी.

४) सत्यप्रत बियाणे (Truthful Seed) टॅगचा रंग हिरवा, धान्य उत्पादनाकरिता पेरणीसाठी उपयोगी.

बियाण्याचा टॅग व पिशवीवरील लॉट नंबर हे खालील बाबी दर्शवितात. उदा. बियाण्याचा लॉट नंबर हा २०१६-१३-०१-०१ असल्यास त्याचे स्पष्टीकरण हे खालीलप्रमाणे आहे :-

१) २०१६ हा पीक काढणीचा महिना व वर्ष असेल. २) १३ हा स्टेट कोड म्हणजेच ज्या राज्यात बियाणे उत्पादित केले आहे, त्या राज्याचा संकेतांक असेल. ३) ०१ हा प्लॉट कोड म्हणजेच सदर बियाण्यावर ज्या बीजप्रक्रिया केंद्रावर प्रक्रिया करण्यात आली असेल, त्या बीजप्रक्रिया केंद्राचा संकेतांक असतो. ४) ०१ हा ग्रोअर कोड म्हणजेच सदर बियाणे ज्या शेतकऱ्याने उत्पादित केले आहे त्या शेतकऱ्याचा संकेतांक असतो.

प्रमुख राज्याचे स्टेट कोड (संकेतांक) खालील प्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| ०१- आंध्र प्रदेश | ०६-गुजरात | १०-कर्नाटक |
| १२-मध्य प्रदेश | १३-महाराष्ट्र | २४-उत्तर प्रदेश |

■